दि. १५/०५/२०२५

# प्रेस नोट

## वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत प्लास्टिक मुक्तीवर जनजागृती कार्यक्रम संपन्न

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय मार्फत **राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP)** अंतर्गत, वसई विरार शहर महानगरपालिका (NCAP) व स्वच्छता विभागाच्या वतीने प्लास्टिक मुक्तीवर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमासाठी **मुख्य अतिथी म्हणून वसई-विरार शहर महानगरपालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. इंद्रजीत गोरे, उपायुक्त श्री. नानासाहेब कामठे, श्री. दीपक झिंजाड, सौ. अर्चना दिवे, सहाय्यक आयुक्त सौ. नीता कोरे, सौ. गौरी पाटील, श्रीमती सौंदर्या संखे, श्री. अजय चौकेकर, सौ. मेधा वर्तक, सौ. मनाली शिंदे, NCAP सल्लागार कु. प्रिती गालने, सौ. तृप्ती राऊत, नगररचनाकार श्रीमती श्वेता माने आणि शहर प्रकल्प अधिकारी सौ. रूपाली कदम** हे उपस्थित होते. तसेच **पर्यावरण विषयक वक्त्या श्रीमती पूजा शिंदे** यादेखील उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात सर्व मान्यवरांचे **वृक्षरोप व कॅप देऊन स्वागत** करून करण्यात आली. त्यानंतर पर्यावरण विषयक वक्ते श्रीमती पूजा शिंदे यांनी पॉवर पॉइंट सादरीकरण करताना प्लास्टिकमुळे पर्यावरण व मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि आवश्यक खबरदारी याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. इंद्रजीत गोरे यांनी राष्ट्रीय हवा गुणवत्ता कार्यक्रमाअंतर्गत प्लास्टिक मुक्तीकरिता हाती घेतलेल्या उपक्रमाचे कौतुक करत, महानगरपालिकेच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमाचे( NCAP) आभार मानले. त्यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना टाकाऊ प्लास्टिकपासून टिकाऊ वस्तू तयार करण्यावर भर देण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात **‘एलाईड सोल्युशन सर्व्हिस संस्थेच्या** वतीने प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले. या सादरीकरणातून **“प्लास्टिकचा वापर टाळा, कापडी पिशव्यांचा वापर करा”** असा संदेश प्रभावीपणे दिला गेला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक आयुक्त श्री. विश्वनाथ तळेकर यांनी केले, तर उपायुक्त श्री. नानासाहेब कामठे यांनी उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

**मुख्यालय**
**वसई विरार शहर महानगरपालिका**